RNI No. MAHBIL /2009/40124

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग पाच

वर्ष ९, अंक १९(८)] शुक्रवार, जुलै २८, २०२३/श्रावण ६, शके १९४५ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २६.००

**असाधारण क्रमांक ५१**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र विधानसभेत व महाराष्ट्र विधानपरिषदेत सादर केलेली विधेयके.**

---

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

महाराष्ट्र विधानसभेत दिनांक **२८ जुलै, २०२३** रोजी पुरःस्थापित करण्यात आलेले खालील विधेयक, महाराष्ट्र विधानसभा नियम **११६** अन्वये प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

**L. A. BILL No. XXXV OF 2023.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA SHOPS AND ESTABLISHMENT (REGULATION OF EMPLOYMENT AND CONDITIONS OF SERVICE) ACT, 2017.

**सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३५.**

**महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तींचे विनियमन) अधिनियम, २०१७ यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.**

**ज्याअर्थी,** यात पुढे दिलेल्या प्रयोजनाकरिता महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तींचे विनियमन) अधिनियमात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या चौऱ्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तींचे विनियमन) (सुधारणा) अधिनियम, २०२३, असे म्हणावे. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

(२) तो, महाराष्ट्र शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास लागू होईल.

(३) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू राहील.

सन २०१७ चा अधिनियम ६१ याच्या कलम १८ च्या (८) मध्ये उपखंड (ख-१) दाखल करणे.

**२.** महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवा शर्तीचे विनियमन) अधिनियम, २०१७ मधील कलम १८ च्या पोट-कलम (८) उपखंड (ख) नंतर उपखंड (ख-१) दाखल करण्यात येईल :—

(ख-१) " कलम २ च्या पोट-कलम (४) मध्ये नमूद आस्थापनांमधील प्रत्येक महिला कर्मचाऱ्यास मासिक पाळीच्या कालावधीत भरपगारी रजा देण्यात येईल. "

## उद्देश व कारणे यांचे निवेदन.

दुकाने, वाणिज्यिक आस्थापना, निवासी हॉटेले, उपाहारगृहे, खाद्यगृहे, थिएटरे, सार्वजनिक मनोरंजनाच्या किंवा करमणुकीच्या इतर जागा व इतर आस्थापना यांतील कामाच्या व नोकरीच्या व सेवाशर्तींचे विनियमन करण्याशी संबंधित असलेल्या कायद्याचे एकत्रीकरण करण्याकरिता आणि त्यात सुधारणा करण्याकरिता महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तींचे विनियमन) अधिनियम, २०१७ अधिनियमित केला आहे.

या अधिनियमातील कलम १८ मधील पोट-कलम (८) (ख) नुसार संबंधित आस्थापनावरील कर्मचाऱ्यांना, प्रसूती लाभ अधिनियम, १९६१ मध्ये यासाठी तरतूद केल्याप्रमाणे प्रसूती रजा ही वेतनी रजा देण्यास मान्यता दिलेली आहे. परंतु यात महिला कर्मचाऱ्यास प्रसूती रजेचा लाभ दिला जात असताना मासिक पाळीच्या गंभीर समस्येकडे मात्र दुर्लक्ष झाल्याचे दिसून येते. महिलांना मासिक पाळीच्या कालावधीत जास्त रक्तस्त्राव होतो, प्रचंड चिडचिड होते आणि महिलांना शारीरिक आणि मानसिक त्रासालाही सामोरे जावे लागत असल्याने त्यांना विश्रांतीची फार गरज असते.

अलिकडच्या काळात रोजगार करणाऱ्या महिलांच्या संख्येमध्ये प्रचंड वाढ झालेली आहे. या महिलांना प्रत्येक महिन्याला वेदनादायक समस्येला सामोरे जावे लागते. मात्र आस्थापनांच्या नोकरीबाबतच्या नियमांमुळे त्यांना रजा मिळत नाही, अनेक महिलांना शारीरिक व मानसिक त्रास होत असतांनाही नाईलाजाने कामावर हजर रहावे लागते व त्याच स्थितीत आपले कर्तव्य पार पाडावे लागते. सामान्यतः सर्वच स्त्रियांना होणरा हा त्रास असून या काळात महिलांची प्रचंड चिडचिड, थकवा, नैराश्य येणे, काही वेळा गर्भाशयाच्या गाठी, गर्भनलिका व बिजांड यावर सूज येणे, घाम येणे, छातीमध्ये धडधड होणे, हातपाय बधिर होणे, मुंग्या येणे, डोकेदुखी, शरीरावरील चरबी वाढणे, पोटामध्ये गॅस होणे आणि लघवीचा त्रास होणे यावर वेळीच काळजी घेता येत नसल्याने जीवघेण्या दुर्धर आजारांचा सामना करावा लागतो. तसेच यांसारख्या अनेक त्रासदायक बाबींना प्रत्येक वेळी सामोरे जावे लागते. महिलांना मासिक पाळीच्या काळात स्वच्छतेची विशेष काळजी घ्यावी लागते. त्याचप्रमाणे उत्तम मानसिक स्वास्थ्य लाभणे आवश्यक असते. परंतु रजेअभावी यापासून महिला कर्मचाऱ्यांना वंचित रहावे लागते.

महाराष्ट्रात बहुतांशी आस्थापनांकडून महिला कर्मचाऱ्यांना मासिक पाळी कालावधीत कोणतीही सूट दिली जात नाही. परंतु मासिक पाळीसाठी भरपगारी विशेष रजा देणारे केरळ व बिहार ही देशातील केवळ दोन राज्ये आहेत. त्यामुळे पुरोगामी महाराष्ट्र राज्यातही यासाठी रजा देण्याची तरतूद करणे ही काळाची गरज आहे. त्यामुळे महिला कर्मचाऱ्यांना मासिक पाळी कालावधीत वेतनी रजा मिळणेसाठी सक्षम व परिणामकारक व्यवस्था निर्माण करणेसाठी सध्या अस्तित्वात असलेल्या महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तींचे विनियमन) अधिनियम, २०१७ यामध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट वाटते.

वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक २७ जुलै, २०२३.

**डॉ. जितेंद्र आव्हाड,**
प्रभारी सदस्य.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक २८ जुलै, २०२३.

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.